| | |
|---|---|
| MHSN080006622024 | दाखल तारीख – १५.०६.२०२४<br>नोंदणी तारीख – १५.०६.२०२४<br>निकाल तारीख – १२.०३.२०२६<br>कालावधी – वर्षे – महिने – दिवस<br>०१ ०८ २७ |

**जत येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालय,**
**(पिठासीन अधिकारी प्रकाश चु. बछले)**

**नियमित फौजदारी खटला क्र.१९५/२०२४**
**निशाणी क्र.२७**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>जत पोलीस ठाणे. |
| अभियोग पक्षातर्फे | | श्री. अ. व. विरकर<br>सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| | | |
| आरोपी | **१.**<br><br>**२.** | **संजय लक्ष्मण यमगर,**<br>वय–४५ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>**विश्वजीत संजय यमगर,**<br>वय–१८ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,<br>दोघे रा. बिरनाळ, ता. जत, जि. सांगली. |
| आरोपीतर्फे वकील | | श्री. एस. एन. पाटील |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | – | २०.०३.२०२३ |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | – | १५४/२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | – | २०.०३.२०२३ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | – | १५.०६.२०२४ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | – | १४.११.२०२५ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | – | ०७.०३.२०२६ |
| युक्तिवाद दिनांक | – | १२.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | – | १२.०३.२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | – | ---- |

## आरोपीची माहिती

| अ. क्र. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपातील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | फौ.प्र. सं.कलम ४२८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संजय लक्ष्मण यमगर | दिनांक २३.०३.२०२३ रोजी फौ.प्र.सं.४१ अ(१) अन्वये नोटीस | १४.११.२०२५ | भा.दं.वि.स. कलम ३२४, ५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | --- | --- |
| २. | विश्वजीत संजय यमगर | दिनांक २३.०३.२०२३ रोजी फौ.प्र.सं.४१ अ(१) अन्वये नोटीस | १.११.२०२५ | | निर्दोष मुक्तता | --- | --- |

## भाग क

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ. अभियोगपक्ष :**

| अ नं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १ | बिरुदेव सदाशिव यमगर | प्रत्यक्षदर्शी जखमी साक्षीदार |
| २ | बिरा बाबुराव कोंडीकिरे | साक्षीदार |

**ब. बचावपक्षाचे साक्षीदार, असेल तर**

| अ नं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | — | — |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असेल तर**

| अ नं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| — | — | — |

## अभियोगपक्ष/ बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी

**अ. अभियोगपक्ष**

| **अ नं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | — | — |

**ब. बचाव**

| **अ नं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| --- | -- | -- |

**क.न्यायालयीन निशाणी**

| **अ नं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | २१ | घटनास्थळ पंचनामा |

| | | |
|---|---|---|
| २. | २२ | मुद्देमाल जप्ती पंचनामा |
| | २३ | जखमी बिरुदेव यांचे वैदयकीय प्रमाणपत्र |

**ड. भौतिक वस्तु**

| **अ नं.** | **वस्तु क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| --- | -- | -- |

## न्या य नि र्ण य
## (घोषित दिनांक १२.०३.२०२६)

आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता १८६० (येथून पुढे संक्षिप्तपणे भा.द.वि. असे संबोधण्यात येईल) चे कलम ३२४,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप आहे.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात पुढीलप्रमाणे** –

**२.** फिर्यादी बिरुदेव सदाशिव यमगर हे मौजे बिरनाळ, ता. संख येथे त्यांचे कुटुंबासमवेत राहतात. आरोपी क्र.१ हा फिर्यादी यांचा सख्खा चुलत भाउ आहे. फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये विहिरीच्या पाण्याच्या पाळीवरुन दिनांक १८.०३.२०२३ रोजी किरकोळ वाद झाला होता. दिनांक २०.०३.२०२३ रोजी ११.०० वा. फिर्यादी यांचा चुलत भाउ संदीप विलास यमगर याचे घरासमोर, फिर्यादी व आरोपी यांच्या मधील वाद गावातील प्रतिष्ठीत लोक मिटवत असताना, आरोपी क्र.१ यांनी "मी तुला पाण्याची पाळी देत नाही, तुला काय करायचे आहे ते कर", असे म्हणून फिर्यादी यांना शिवीगाळ व दमदाटी केली. त्याचवेळी आरोपी क्र.२ याने त्याचे हातातील कडयाने फिर्यादी यांच्या डोक्यात मारुन त्यांना जखमी केले. त्यानंतर तेथे जमलेल्या लोकांनी भांडणे सोडविली. त्यानंतर, फिर्यादी यांनी जत पोलीस ठाणे येथे तक्रार दिली. म्हणून आरोपी विरुध्द भा.द.वि.कलम ३२४,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंद करणेत आला.

३. सदर गुन्ह्याचा तपास श्री. ए. बी. मासाळ, पो.ना.ब.क्र.११९५, जत पोलीस ठाणे यांनी केला. त्यांनी आरोपींना नोटीस दिली. गुन्हयामध्ये वापरणेत आलेला मुद्देमाल जप्त केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. घटनास्थळ व मुद्देमाल जप्तीचा पंचनामा केला. जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. चौकशीअंती आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. निशाणी क्र.११ कडे भा.द.वि.कलम ३२४,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये आरोपीवर दोषारोप ठेवणेत आला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटला पुढे चालविण्याची संमत्ती दर्शविली. गुन्हयामध्ये गोवविण्याइतपत पुरावा आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नि.क्र.२५ व २६ कडे नोंदविणेत आले.

४. प्रस्तुत प्रकरणातील सारांश तसेच अभिलेखावर दाखल पुरावा व कागदपत्रे तसेच दोन्ही वकीलांचा युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दयावरील निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे दिले आहेत–

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २०.०३.२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. मौजे बिरनाळ, ता. जत येथे आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी यांना हातातील कडयाने मारहाण करून ऐच्छीक दुखापत पोहोचवली आणि त्यायोगे भा.द.वि. कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नाही. |
| २. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून त्यांचा अपमान करून ते सार्वजनिक शांततेचा भंग करतील असे प्रक्षोभन दिले आणि त्यायोगे भा.द.वि. कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस दमदाटी करून भा.द.वि.सं. कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही. |
| ४. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

५. अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द गुन्हा शाबीत करण्याच्या दृष्टीने प्रत्यक्षदर्शी जखमी साक्षीदार फिर्यादी बिरुदेव सदाशिव यमगर बिरा बाबुराव कोंडीकिरे यांना अनुक्रमे नि.१६ व २० कडे तपासलेले आहे. घटनास्थळ पंचनामा, मुद्देमाल जप्ती पंचनमा व जखमी बिरुदेव यांचे वैदयकीय प्रमाणपत्र इ. कागदपत्रे आरोपींनी मान्य केली असल्यामुळे त्यांना अनुक्रमे नि.२१ ते २३ देण्यात आली.

**विचाराधीन बाबी क्र.१ ते ३ बाबत**:–

६. विचाराधीन बाबी क्र.१ ते ३ या एकमेकांशी निगडीत असल्याने व समान पुराव्यावरच अवलंबून असल्याने उपलब्ध असलेल्या पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व विचाराधीन बाबींचे विवेचन एकत्रीत केलेले आहे.

७. आरोपी विरुध्द गुन्हा शाबीतीकरिता अभियोग पक्षाने जखमी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार बिरुदेव यांना नि.१६ कडे तपासलेले आहे. त्यांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी असे कथन केले की, दोन वर्षापुर्वी दुपारी घटना घडली होती. त्या दिवशी त्यांच्यामध्ये व आरोपी क्र.१ यांच्यामध्ये किरकोळ वाद झाला होता. त्यामुळे, त्यांनी पोलीस ठाणेत तक्रार दिली होती. फिर्याद व छापील पहिली खबर वर त्यांच्या सहया असून त्यातील मजकूर त्यांना आठवत नाही. अशाप्रकारे साक्षीदारास

घटनेसंदर्भात सांगता आले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे, सदर साक्षीदाराला अभियोग पक्षातर्फे फितूर घोषीत करुन त्याचा विस्तृत उलटतपास घेतला. उलटतपासादरम्यान त्यांनी हे मान्य केले की, आरोपींनी त्याना शिवीगाळ व दमदाटी केली होती. त्याबरोबर हे देखील कबूल केले की, आरोपी क्र.२ यांनी हातातील कडयाने त्यांच्या डोकीत मारहाण केली होती आणि त्यामुळे, त्यांनी फिर्याद (नि.१९) दिली होती.

८. तथापी आरोपीतर्फे घेणेत आलेल्या उलटतपासादरम्यान साक्षीदाराने ही बाब मान्य केली की, त्यांना घटनेची निश्चित तारीख आठवत नाही. त्याचप्रमाणे पोलीसांनी त्यांचा जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला नाही. त्यातील मजकूर पोलीसांनी त्यांच्या मनाने लिहिला होता. तसेच साक्षीदाराने हे देखील स्पष्ट कबूल केले की, आरोपींनी त्यांना कडयाने मारहाण, दमदाटी व शिवीगाळ केलेली नाही. आपसात तडजोड झाली असून त्यांची आरोपी विरुध्द तक्रार राहिलेली नाही. सा.क्र.बिरा यांनी त्यांची साक्ष नि.२० कडे नोंदविलेली आहे. तथापी, त्यांना देखील घटनेसंदर्भात अचूक सांगता आलेले नाही. आरोपीतर्फे विधीज्ञांनी त्यांचा उलटतपास घेण्याचे नाकारले.

९. प्रस्तुत केसमधील फिर्यादी व आरोपी यांनी नि.क्र.१४ कडे अर्ज सादर करुन त्यांच्यामध्ये तडजोड झाल्याचे कथन केले. परंतु भा.द.वि.कलम ३२४ हा गुन्हा तडजोड पात्र नसलेने सदरचा अर्ज नामंजूर करणेत आला. फिर्यादी व आरोपी यांची संयुक्त तडजोड पुरशिस नि.१५ कडे दाखल आहे. फिर्यादी यांनी त्यांचा पुरावा संपलेची पुरशिस नि.२४ कडे दाखल केल्याचे इतर साक्षीदार तपासण्याचे प्रयोजन उरले नाही.

१०. एकंदरीत अभियोग पक्षातर्फे अभिलेखावर आलेला पुरावा विचारात घेता, ज्या व्यक्तीला मारहाण केल्यामुळे दुखापत झालेली आहे ती व्यक्तीच जर आरोपी विरुध्द न्यायालयामध्ये काहीही कथन करीत नसेल तर फिर्याद भारतीय पुरावा कायदयाप्रमाणे शाबीत झाली असे म्हणता येणार नाही. त्याचबरोबर आरोपीने घटनास्थळ व मुद्देमाल जप्ती पंचनामा मान्य केला असल्यामुळे घटना बिरनाळ येथे संदीप यमगर यांचे घरापुढे

घडली होती व स्टीलचे एक गोलाकार कडे जप्त करण्यात आले होते असे म्हणता येईल. तसेच आरोपीतर्फे जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र देखील मान्य करण्यात आलेले आहे. तथापी, सदर प्रमाणपत्रामध्ये नमूद करणेत आलेल्या जखमा या आरोपींच्या मारहाणीमुळे झाल्या ही बाब शाबीत झालेली नाही. फिर्यादी यांनी अभियोग पक्षास सबळ पुरावा अभिलेखावर आणणेकरिता कोणत्याही प्रकारे सहाय्य केलेले नाही. त्यामुळे, फिर्यादी यांना केलेल्या शिवीगाळ, दमदाटी व मारहाणीची जबाबदारी आरोपीवर टाकता येवू शकत नाही.

**११.** एकंदरीत वरील सर्व विवेचनावरुन असे दिसते की, आरोपीवर भा.द.वि.कलम ३२४,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये निश्चित करण्यात आलेले दोषारोप हे अभियोग पक्ष यांना संशयापलीकडे शाबीत करण्यास अपयश आलेले आहे. तसेच आरोपी विरुध्द कोणताही प्रत्यक्षदर्शी किंवा परिस्थितीजन्य पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सदरची बाब विचारात घेता, आरोपी हे पुरेशा पुराव्या अभावी निर्दोष मुक्ततेस पात्र ठरतात. म्हणून, मी विचाराधीन बाब क्र.१ ते ३ ची उत्तरे नकारार्थी नोंदवून विचाराधीन बाब क्र.४ करिता खालीप्रमाणे आदेश पारित करीत आहे.,

## <u>आदेश</u>

**१.** आरोपी क्र.१ संजय लक्ष्मण यमगर व आरोपी क्र.२ विश्वजीत संजय यमगर यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२४,५०४,५०६ या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

**२.** आरोपींचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

**३.** जप्त करण्यात आलेले कडे मुल्यहिन असल्यामुळे ते आव्हान कालावधीनंतर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५२ अन्वये नष्ट करणेत यावे.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) चे तरतुदीची पुर्तता करणेसाठी प्रत्येकी रुपये १५,०००/- चे बंधपत्र व जामीनपत्र पुढील सहा महिन्याकरिता देणेत यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयामध्ये पारित करणेत आला.)

PRAKASH CHUNNI BACHHALE

Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2026.03.17 11:36:50 +0530

दिनांक –१२.०३.२०२६
जत.

**(प्रकाश चु. बछले)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जत.

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment/order are same, word to word, as per the original judgment/order;

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | R. B. Samalewale, |
| Court Name | : | Shri. P. C. Bachhale |
| Date of judgment/order | : | 12.03.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 16.03.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 17.03.2026 |